**<u>जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-</u>**

**१) <u>श्री.हेमंत डोर्लीकर, रा.गडचिरोली, तालुका जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर ७७ रेती घाट प्रस्तावांच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची प्रत अभ्यासण्याकरिता देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की ७७ रेती घाट प्रकल्पांची पर्यावरण व्यवस्थापन आराखड्याची प्रत सर्व ग्रामपंचायतींना देण्यात आलेली आहे. |
| २) | रेतीघाटापासून मुख्य रस्त्यापर्यंतची अवजड वाहतूक केल्यामुळे रस्त्याची दुर्दशा/नूकसानहोते कारण रस्ते त्या क्षमतेचे नसतात. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून रस्त्याची डागडुजी करणे, योग्य क्षमतेचे रस्ते बांधणे या बाबींचा पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवालात समावेश केला आहे काय किंवा करणार आहेत काय? | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, रेती घाट लिलावधारकाकडुन पर्यावरण व्यवस्थापन आराखड्याकरीता बँक गॅरंटीच्या स्वरुपात रक्कम जमा करण्यात येते. त्यानुसार रस्त्याच्या देखभालीकरीता सदर रकमेचा समावेश असतो. |

**२) <u>श्री. रामदास पांडुरंग जराते, रा. पुलखल, तालुका जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रस्तावित रेती घाटांपैकी पुलखल गावातील क्रं. ४ च्या रेती घाटाबाबत आमचा लेखी आक्षेप आहे. दि. २३/०८/२०२२ रोजी झालेल्या ग्रामसभेमध्ये एकमताने पुलखल गावातील रेती घाटाचा लिलाव होऊ न देणेबाबत ठराव पारित करण्यात आला होता. त्यानंतर मा. उप-विभागीय अधिकारी यांनी दि. १९/१०/२०२२ रोजी सदर ठरावाच्या पडताळणीकरिता ग्रामसभा घेण्याचे आदेश | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की ७७ रेती घाट प्रकल्पांची पर्यावरण पर्यावरण व्यवस्थापन आराखड्याची प्रत सर्व ग्रामपंचायतींना देण्यात आलेली आहे.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी नमूद केले की पुलखल रेती घाटाबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे आदेशानंतर याबाबत पुढील निर्णय घेण्याचे मान्य केले. |

| | | |
|---|---|---|
| | पारित करण्यात आले होते. सदर आदेशामुळे पेसा क्षेत्रातील ग्राम पंचायतींचे अधिकार बाधित होत आहेत.सदर आदेश व पुलखल रेतीघाट लिलावाविरूद्ध मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर येथे याचिका दाखल करण्यात आली आहे. सदर याचिकेवर आजपर्यंत अंतिम निर्णय येणे बाकी आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, पुलखल रेतीघाटाच्या लिलावाबाबत कोणत्याही प्रकारचा निर्णय जनसुनावणी दरम्यान घेण्यात येऊ नये. सन २०२१-२२ च्या रेती घाटाच्या लिलाव प्रक्रियेला पुलखल ग्रामपंचायतीची परवानगी न घेताच करण्यात आला. तसेच क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात वाळू उत्खनन करण्यात आले. अस्तित्वात असलेल्या रेती घाटातून उपसा न करता नविन कृत्रिम रेती घाट तयार करून वाळू उत्खनन करण्यात आले. त्यामुळे गावाचे मोठे नूकसान झाले. तेथील मोठी दरड जेसीबी लावून खोदण्यात आली व वाहतूकीमुळे पुलखल-दुरजा या मार्गाचे जवळपास अंदाजे रू. ६० लक्षचे नूकसान झालेले आहे. नदीकडे जाणाऱ्या रस्त्याचीसुद्धा दुर्दशा झाली. या वर्षीच्या प्रस्तावित रेती घाटालासुद्धा ग्रामपंचायतीने नकार दिलेला आहे. सदर जनसुनावणी पुलखल गावामध्ये न घेतल्यामुळे गावातील माजकेच नागरीक सुनावणीस उपस्थित आहेत. संविधानाच्या भाग ९ च्या तरतूदीनूसार पेसा क्षेत्रामध्ये इतर कायदे गौण ठरून पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होते. पेसा कायद्यामधील कलम ४ च्या तरतूदी व महाराष्ट्र शासनाचे सन २०१४ च्या नियम ३२ नूसार सदर जनसुनावणी पुलखल गावातच आयोजित करण्यात आली पाहिजे. करिता | |

| | | |
|---|---|---|
| | आमचा या जनसुनावणीस आक्षेप आहे व रेतीघाट मान्यतेबाबत परवानगी घेण्यात येऊ नये. याबाबतचा लेखी आक्षेप जनसुनावणी समितीने स्वीकारावा. | |
| २) | पूर्वी पुलखल रेती घाटमधून उपसा झाल्यामुळे वैनगंगा नदीचा प्रवाह बदलला असून तो विरुद्ध दिशेला गेलेला आहे. घाटाच्या वरच्या बाजूचा नदीचा प्रवाहसुद्धा बदलेला आहे. त्यामुळे गावातील पाण्याच्या स्त्रोतांवरसुद्धा परिणाम होत आहे. रेतीच्या अवैध उपस्यामुळे नदीचे प्रवाह बदलतात व गावातील पाण्याच्या स्त्रोतांवरसुद्धा परिणाम होतो.त्यामुळे रेतीचे अवैध उत्खनन थांबवावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, उक्त बाबींची दक्षता घेण्यात येईल. |

**३) <u>श्री.अमोल मारकवार, तालुका जिल्हा-गडचिरोली:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सन २०२१-२२ मध्ये झालेल्या रेती घाट जनसुनावणीदरम्यान वृक्ष लागवड करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार रेती घाट परिसरात आजपर्यंत किती झाडे लागली व झाडे न लावल्या कंत्राटदारावर कार्य कारवाई केली याबाबत सांगण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की कंत्राटदाराकडून बँक हमी घेण्यात येते व त्याला अनुपालन अहवाल सादर करावयाचा असतो. सदर अहवालाच्या तपासणीदरम्यान त्रुटी आढळल्यास अमानत रक्कम जप्त करण्यात येते व त्रुटी न आढळल्यास अमानत रक्कम कंत्राटदारास वापस करण्यात येते. |
| २) | वाघाळा घाटाजवळ स्थानिक व विदेशी पक्ष्यांचे थवे येत असतात. सदर घाट हा प्रेक्षणीय आहे. रेती घाट लिलावामुळे येथील पक्षांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. याबाबत पक्षी तज्ञांचे मत घेऊन उपाय योजना कराव्यात. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की पक्षी तज्ञांचे मत घेऊन उपाय योजना करण्यात येतील. |

